अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,

आस्थापना विभाग, पुणे मनपा.

जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/ ६५३०

दिनांक :- १५/०३/२०२०

-: कार्यालयीन आदेश :-

विषय :- **<u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.</u>**
प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत घरात विलगीकरण कक्ष तयार करून जंतुनाशकाची फवारणी करणेबाबत.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

वरील संदर्भाचे अनुषंगाने शहरात प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत ज्या निवास्थानामध्ये कोरोना विषाणू (कोविड-१९) संशयित रुग्णाचे विलगीकरण केले आहे. तसेच डॉ.नायडू रुग्णालय, विलगीकरण कक्ष, मनपाने केलेले तात्पुरते विलगीकरण संस्था व इतर महत्वाचे संस्था इ. ठिकाणी १ टक्के सोडियम हायपोक्लोराईट द्रावणाने निर्जंतुकीकरण फवारणी (Spraying) करणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने कीटक प्रतिबंधक विभागाकडील सर्व मलेरिया सर्व्हेलन्स इन्स्पेक्टर (MSI) यांना आदेशित करण्यात येते की आपले नियंत्रणाखाली काम करणा-या सर्व सेवकांचे १ टक्के सोडियम हायपोक्लोराईट द्रावण विषयक तातडीने प्रशिक्षण घेऊन मुख्य खात्याकडून व वरिष्ठांकडून कळविण्यात आलेल्या आपल्याशी संबंधित असलेल्या उपरोक्त परिसरामध्ये पहिल्या टप्यामध्ये अतिजोखमीच्या भागामध्ये १ टक्के सोडियम हायपोक्लोराईट या द्रावणाच्या फवारणी व कोल्ड फॉगिंगचा नियोजित कार्यक्रमाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी.

तसेच निवास्थानामध्ये विलगीकरण कक्षाबाबत मार्गदर्शक सूचना मराठी / इंग्रजी तसेच जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी या अनुषंगाने दि.१४.०३.२०२० रोजी निर्गत केलेले पत्र द्यावे, व सदर ठिकाणी १ टक्के सोडियम हायपोक्लोराईट द्रावणाने निर्जंतुकीकरण फवारणी (Spraying) करून घेण्यात यावी.

सदर मलेरिया सर्व्हेलन्स इन्स्पेक्टर यांनी सदरचे कामकाजाबाबतची कार्यवाही डॉ.वैशाली जाधव यांचे नियंत्रणाखाली करावी व त्याचा अहवाल डॉ.वैशाली जाधव व संबंधित उप आयुक्त, परिमंडळ विभाग यांना सादर करावा.

सदरच्या कामास नकार देणा-या / हलगर्जीपणा करणा-या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

Rubal 15/3/2020

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत -
मा.महापालिका आयुक्त,
मा.अतिरिक्त आयुक्त (वि) यांना माहितीस्तव.

प्रती –
संबंधीत मा. खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका

E:\comp2\PMC NO 2\prabhune_1\KARYALAIN ADESH (from May 2018).doc